!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७० ०१-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संघटनशक्तीतुन महिलांचे सबलीकरण शक्य –जिल्हाधिकारी निधी पांड्ये

## बचत गटांच्या वस्तु प्रदर्शनाचे जिल्हाधिकारी निधी पांड्ये यांच्याहस्ते उद्घाटन

**संभाजीनगर ( ता.०६ ) :** महिलांच्या संघटन शक्तीतुनच सबलीकरण शक्य असुन त्यासाठी बचतगटांना प्रोत्साहान देणारे उपक्रम अभिनंदनिय आहेत. शासकिय यंत्रेणेची यासाठी आवश्यक ती मदत देण्याचा प्रयत्न राहिल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी निधी पांड्ये यांनी केले.

मातोश्री महिला बचत महासंघाच्या मार्गदर्शनाखाली कैवल्य बचतगट, वाघीणी बचतगट आणि शिवसेना संभाजीनगरच्यावतीने आयोजित बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन व विक्री महोत्सवाचा उद्घाटन जिल्हाधिकारी निधी पांड्ये यांच्याहस्ते रविवारी पार पडले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे होते. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांनी आयोजित या वस्तु प्रदर्शन व विक्री महोत्सवाला जिल्हाधिकारी निधी पांडे यांनी शुभेच्छा दिल्या व उपक्रमाचे कौतुक केले. माँसाहेब मिनाताई ठाकरे यांनीच महिला संघटन व महिला सबलीकरणाचा पाया घातला व बचत गटांना माध्यमातुन महिलांना रोजगार व सबलीकरणासाठी मदत व्हावी म्हणुन रश्मी ठाकरे या सदैव प्रयत्नशिल असल्याचे सांगत वैजयंती खैरे यांनी यापुढे ही अशा प्रकारचे उपक्रम तालुका स्तरावर राबवण्याचा माणस असल्याचे आपल्या मनोगतात सांगितले. माजी महापौर कला ओझा यांनी बचत गटांसाठी स्वतंत्र बचतगट मार्केटची स्थापना करण्याची मागणी यावेळी केली. मातोश्री महिला बचत गट महासंघ देशभरात महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्नशिल असल्याचे जिल्हा कार्यकारिणीचा अध्यक्षा रंजना कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले. अॅड. प्रज्ञा गिरधारी यांनी सुत्रसंचालन केले.

यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, आमदार संजय शिरसाट, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, वैजयंती खैरे, माजी महापौर कला ओझा, माजी महापौर अनिता घोडेल, सुनिता देव, शहरप्रमुख राजु वैद्य, बाळासाहेब थोरात, संतोष जेजुरकर, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, माजी जि.प. अध्यक्षा लता पगारे, मिरा पाटिल, नगरसेवक मकरंद कुलकर्णी, स्वाती किशोर नागरे, गजानन मनगटे, सिमा चक्रनारायण, गजानन मनगटे, आत्माराम पवार, हिरा सलामपुरे, माजी नगरसेवक गोपाळ कुलकर्णी, किशोर नागरे, गिरजाराम हाळनोर, गुलमंडी शाखाप्रमुख सचिन खैरे, सुनिता सोनवणे, किशोर कच्छवाह, रावसाहेब आम्ले, बाबासाहेब डगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**खाऊ गल्लीत गर्दी :** बचतगट प्रदर्शनास स्वतंत्र खाद्य स्टॉलची व्यवस्था करण्यात आली असुन तेथे मिसळ पासुन, चाईनिज, दाबेली, वडापाव, झुनका भाकर, कोल्हापुरी तडका, ज्युस, आवळयाचे पदार्थ चकल्या, पापड अशी ४० हुन अधिक स्टॉल आहेत.यामध्ये उद्घाटनापासुनच गर्दी बघायला मिळाली आलेल्या मान्वरांनीही मोह आवरता आला नाही.

**१४५ स्टॉलचे नियोजनबध्द प्रदर्शन :** गजानन महाराज मंदिराच्यामागे असलेल्या कडा मैदावर १४५ स्टॉलचे नियोजन बद्ध विक्री प्रदर्शनात घरगुती उपयोगाच्या वस्तु, हस्तकला, रांगोळया, कपडे, मसाले, घोंगडी, सौंदर्य प्रसादने आदि वेगवेगळे विभाग आहेत. नगर, बीड, जालना, लातुर जिल्ह्यातुन बचत गटांनी सहभाग नोंदविलेला आहे.

**महिलांचे महिलांसाठी :** प्रदर्शनावर महिलांच्या नियोजनाची छाप बुघायला मिळ्ाली. शिवसेना महिला आघाडी व सांस्कृतीक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केलेले नियोजन थक्क करणारे आहे. यात उपस्थित शिवसेना पदाधिकारि व मान्यवरांनीही साथ दिल्याने कार्यक्रम महिलांचा महिलांसाठी असल्याची चुणूक दिसली.

**महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाना उपस्थित राहण्याचे आवाहन :** महिलांच्या सुप्तकला गुणांना वाव देण्यासाठी ७ मार्च सोमवार सांयकाळी ७ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च मंगळवारी सायंकाळी ७ वाजता किचन फायर सेफ्टी, महिलांसाठी आगीपासुन घ्यावयाची काळजी यासंबंधि प्रात्यक्षिके श्री मांडवकर सादर करणार आहे. व कार्यक्रमाचा समारोप सायं ८ वाजता मातोश्री महिला बचत गट महासंघ व महिला आघाडीच्याप्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहुन प्रदर्शनास मोठ्या संख्येने भेट देण्याचे आवाहन मातोश्री महिला बचत गट महासंघ जिल्हाकार्यकारिणीच्या जिल्हासंघटक रंजना कुलकर्णी, मुक्ता खैरे, नलिनी बाहेती, अंजली मांडवकर, दुर्गा भाटी, मंजुषा नागरे, अनुपमा कुलकर्णी, मिना बेलसरे, मिना तांबोळी, रश्मी ढापरे, प्रज्ञा गिरधारी यांनी केले.

या उद्घाटन प्रसंगी सुनिला क्षत्रिय, लक्ष्मी नरहिरे, आशा दातार, विजया त्रिभुवन, किरण शर्मा, सुनंदा खरात, अरुणा भाटी, राजश्री पोफळे, शुभांगी पत्की, शांता चौकेकर, पुष्पा राजे, कमल पिंप्रे, मिनाली बनसोड, चंद्रकला चव्हाण,अनुसया शिंदे, मंगल बडगुजर, कल्पना कुलकर्णी, अमिता लेकुरवाळे, सुमती खडके, चित्रा जोशी, संगिता आंधळे, रुख्मणबाई पवार, रुपाली जोशी, संगिता भोसले, ज्योती गाजरे, सुवर्णा चव्हाण, रामदुलारी बावरिया, मंगल डोंगरे, रंजना आहेर, शोभा गिते, शोभा साबळे, शोला पाहुले, जयश्री लुंगारे, विद्या अग्नीहोत्री, सिता गवई, मीरा पारखे, केशर बडे, पुष्पा गाजरे, पार्वती गादेकर, वच्छला टारपे, पार्वती गादेकर, ज्योती वायकोस, रेखा वानखेडे, प्रेमलता चंदन, सरस्वती गव्हारे, उज्ज्वला मुधीराज, संतोष खोंडकर, विष्णु पोळ, कल्याण पांडे, बापु कवडे, सचिन जेजुरकर, दिपक संभेराव, सुरेश पवार, जयश्री घाटगे यांची उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525